**श्रीमती कल्पना रमाकांत कोल्हे यांना सेवानिवृत्ती वेतन विषयक लाभ मंजूर करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक HTED-15027/18/2026-MHT-(TE-6),**

४ था मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, विस्तार भवन,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ११ ऑगस्ट, २०२६.

पहावे :- १) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.सीटीई-११७७/१३१६२६(३३४०)/IX, दिनांक १८ मे, १९७८

२) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.एईडी-१२८७/७४१३/तांशि-३, दिनांक ४ जानेवारी, १९८८

३) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्र. एडीआर-१०९३/१३२/(२९)/तांशि-५, दिनांक १६ नोव्हेंबर, १९९६

४) मा. महालेखापाल, मुंबई यांचे पत्र क्र. PR-9/CH-4/P/25/10/60768124/1025474656/P26/10/60497630/1379, दिनांक ०१ जानेवारी, २०२६

५) कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक डिओअे-२०२६/पाच/३४१, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६

६) कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक डिओअे-२०२६/पाच/३१६६५४१, दिनांक २८ एप्रिल, २०२६

**प्रस्तावना :-**

श्रीमती कल्पना रमाकांत कोल्हे, लिपिक, शरद पवार चित्रकला महाविद्यालय, नागपूर या सेवानिवृत्तीवेतन मिळण्यास पात्र आहेत किंवा कसे याबाबत प्रशासनिक मंजूरी घेण्याचा प्रस्ताव संदर्भ क्रमांक ५ अन्वये प्राप्त झाला आहे. सदर प्रकरणी प्रशासकीय मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

शासन मान्यता प्राप्त अनुदानित संस्थेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी देण्यात येणाऱ्या वेतन अनुदानाबाबत दिनांक १८ मे, १९७८ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या असून अनुदानाबाबत काही नियम व निकष विहित केले आहेत. त्यानुसार कर्मचाऱ्यांचे वेतन ९०% अनुदानातून करण्यात येते.

२.      कला संचालनालयाच्या नियंत्रणाखालील सर्व म्हणजेच ३१ अनुदानित कला संस्थांना एकूण खर्चाच्या ९० %इतके अनुदान देण्यात येते,  कोणत्याही संस्थेस १००% अनुदान देण्यात येत नाही.

३.      श्रीमती कल्पना रमाकांत कोल्हे कार्यरत असलेल्या शरद पवार चित्रकला महाविद्यालय, नागपूर या कला संस्थेस अनुदान मंजूर करण्याचा शासन निर्णय दिनांक १ जानेवारी, २००६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.  सदर अनुदान सन २००४-२००५ मध्ये २०%, सन २००५-२००६ मध्ये ५०%, सन २००६-२००७ मध्ये ७५% आणि सन २००७-२००८ पासून ९०%  अनुदान तत्वावर असली तरी देखील सदर संस्थेमध्ये कार्यरत असलेल्या श्रीमती कल्पना रमाकांत कोल्हे यांना सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ अनुज्ञेय ठरत आहे. तसेच श्रीमती कल्पना रमाकांत कोल्हे या दिनांक १६ नोव्हेंबर, १९९६ च्या शासन निर्णयातील अटींची पुर्तता करत आहेत. यास्तव, श्रीमती कल्पना रमाकांत कोल्हे यांना सेवानिवृत्तीवेतन विषयक लाभ मंजूर करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४.      सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०८१११५१६००६७०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

A S MUTYAL

Digitally signed by A S MUTYAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=daee80ec44e60c590272017d95394b0b605cfddee15c8895212ac4add74386f5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEC50BCA597E7B3FD46D9282C52300269EB689D8C130253FCE76651562083F8B, cn=A S MUTYAL
Date: 2026.08.11 15:16:57 +05'30'

**( अ. शा. मुत्याल )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१)  महालेखापाल-१ /२ (लेखा परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर.
२)  संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
५) कोषागार अधिकारी, नागपूर
६) निरिक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) सहाय्यक निरिक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर.
८) श्रीमती कल्पना रमाकांत कोल्हे, लिपिक, (कला संचालनालयामार्फत)
९) निवड नस्ती, तांशि-६.